# COVERAGE IN LOCAL NEWS PAPER



## आयुर्वेद शिक्षण मंडळाच्या आरोग्य शिबिराला प्रतिसाद

राजापूर, ता. २८ : आयुर्वेद शिक्षण मंडळ संचालित अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे रुग्णालय आणि फिनोलेक्स इंड्रस्ट्रीजच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी आणि राजापूर तालुक्यात विविध ठिकाणी मोफत सर्व रोग निदान शिबिरे घेण्यात आली.

आयुर्वेदाचा प्रसार आणि प्रचार व्हावा या उद्देशाने तालुक्यातील आडिवरेचे सुपुत्र वैद्यराज ह. वा. परांजपे यांनी १९३६ मध्ये आयुर्वेद शिक्षण मंडळाची स्थापना केली. त्यातूनच अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय आणि पुणे रुग्णालय येथे सुरू केले. महाविद्यालयाच्या वतीने दरवर्षी राजापूर आणि रत्नागिरी भागामध्ये मोफत आरोग्य शिबिरे घेतली जातात. या वर्षी गोळप रनपार, कोळंबे, मिरजोळे, गावडेआंबेरे, आडिवरे वाडापेठ, आडिवरे कोंडसरबुद्रुक, मेर्वी, कुर्धे, पावस, गोळप, कशेळी आदी ठिकाणी शिबिरे घेण्यात आली. शिबिरांमध्ये रक्तशर्करा, रक्तदाब, विविध रोगतपासणी, महिलांची कॅन्सरपूर्व तपासणी, त्वचा विकार, नेत्रतपासणी आदींच्या अनुषंगाने लोकांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे आणि गरजूंना चष्मे पुरविण्यात आले. संस्था सचिव डॉ. म. ह. परांजपे यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे सीईओ सुनील बैरट, डॉ. अमित पाटील, डॉ. अक्षय काकडे, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. तेजश्री नगरकर, डॉ. अनुराधा चव्हाण, डॉ. नेहा रायचोरकर, डॉ. मनोज चौधरी, डॉ. गजानन डोईफोडे, डॉ. अजिंक्य घाडगे, डॉ. सुश्रुत केतकर, डॉ. सिद्धेश जोशी आदींनी रुग्णांची तपासणी केली.

**राजापूर : संस्थेचे सचिव डॉ. म. ह. परांजपे यांच्या नेतृत्वाखाली शिबिरामध्ये सहभागी झालेले डॉक्टर.**

**News Release covered by Sakal, Rajapur edition on 28.12.2016**

**Similar news was also covered by Prahar on 26.12.2016**

# THANK YOU

☺